



दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०६ | अंक : १६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.३० ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# अखेर मुख्यमंत्र्यांनी तोडगा काढला, तब्बल १७ दिवसांनी आदिवासी विद्यार्थ्यांचे उपोषण मागे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, पुणे :** पुण्यातून मोठी बातमी समोर येत आहे. मांजरी येथे उपोषणाला बसलेल्या आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांनी तब्बल १७ दिवसांनी आपलं उपोषण अखेर मागे घेतलं आहे. पुण्याच्या मांजरीत आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांचे गेल्या १७ दिवसांपासून उपोषण सुरु आहे. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्याकडून याआधीदेखील आंदोलकांची भेट घेऊन समजूत काढण्याचे प्रयत्न करण्यात आले होते. पण आंदोलक आपल्या मागण्यांवर ठाम होते. अखेर आंदोलकांच्या आक्रमक भूमिकेपुढे राज्य सरकारला त्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात महत्त्वाची भूमिका घेतली. त्यांच्या आश्वासनानंतर आंदोलकांची मनधरणी करण्यात सरकारला मोठं यश आलं आहे. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी माजरीत जावून आंदोलकांची भेट घेतली. राज्य सरकारने आश्वासन दिल्यानंतर मंत्री अशोक उईके यांच्या हस्ते आंदोलकांनी ज्यूस पिवून आपलं उपोषण मागे घेतलं. राज्य सरकारच्या आश्वासनानंतर आपण आंदोलन स्थगित करत असून, मागन्या मान्य नाही झाल्यात तर तीव्र आंदोलन केलं जाईल, अशा इशारा आंदोलकांनी उपोषण सोडताना दिलं.

**मुख्यमंत्र्यांनी काढला तोडगा...**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी सकाळी महत्त्वाची बैठक पार पडली. मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांच्या शिष्टमंडळाला मुंबईतील 'वर्षा' निवासस्थानी बोलवत चर्चा केली. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून दोन जीआर काढण्यात आले आहेत. हे दोन्ही जीआर घेऊन आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आंदोलनस्थळी पोहोचले. त्यांनी आंदोलकांसोबत बातचित केली. यावेळी त्यांना आंदोलकांची मनधरणी करण्यात यश आलं. आंदोलनकर्त्यांनी ज्यूस पिवून उपोषण सोडलं.



विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत पाठपुरावा करुन निर्णय घेतला जाणार आहे. तसेच जे निर्णय तातडीने घेण्यासारखे होते, असे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. दुसरीकडे आपल्या मागण्यांची अंमलबजावणी पुढच्या तीन महिन्यात होताना दिसली नाही तर तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा आदोलकांनी उपोषण सोडताना दिला.

**राज्य सरकारकडून 'या' मागण्या मान्य**

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आता 'मेस' सुविधा मिळणार, सेंट्रल किचन पद्धत बंद होणार

आदिवासी विकास विभागाच्या शासकीय वसतिगृहांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजनासाठी मिळणारी डीबीटी योजना रद्द करून 'मेस' सुविधा सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

संबंधित अपर आयुक्तांना पुढील तीन महिन्यांत भोजन ठेका देण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आश्रमशाळांतील विद्यार्थी मृत्यू प्रकरणी तीन महिन्यांत कृती आराखडा तयार करण्यात येणार.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या कारणांचा अभ्यास करण्यासाठी गठीत साळुंखे समितीसह अन्य अहवालांतील शिफारशींचा अभ्यास करून तीन महिन्यांत कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश आदिवासी विकास विभागाने दिले आहेत.

आराखड्याची अंमलबजावणीही पुढील तीन महिन्यांत करून कृती अहवाल शासनाला सादर केला जाणार आहे.

## पारनेर शहरातील विकासकामांना गती; प्रभाग ७ व ११ मध्ये विविध कामांचे भूमिपूजन

पारनेर शहरातील प्रभाग क्रमांक ७ व ११ मधील नागरिकांच्या अनेक दिवसांच्या मागण्यांना आज प्रत्यक्ष विकासकामांच्या माध्यमातून मूर्त स्वरूप मिळत आहे. रस्ते, ड्रेनेज आणि काँक्रिटीकरणाची ही कामे नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी निश्चितच महत्त्वाची ठरणार आहेत. आमदार काशिनाथ दाते यांनी नागरिकांच्या मागण्यांची दखल घेऊन निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. यापुढेही पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही एकजुटीने प्रयत्नशील राहू.

**– कविता औटी (शहराध्यक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पारनेर)**



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** रक्षाबंधनाच्या पवित्र व शुभमुहूर्तावर पारनेर शहरातील प्रभाग क्रमांक ७ व ११ मधील विविध विकासकामांना प्रत्यक्ष सुरुवात झाली. पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते या विविध विकासकामांचे भूमिपूजन समारंभ उत्साहात संपन्न झाले.

या विकासकामांमध्ये कान्हूर रोड ते शिवाजी रोड मुख्य रस्त्याचे डांबरीकरण, कानिफनाथ मंदिर ते बापू शिंदे घरापर्यंत ड्रेनेज लाईन व रस्ता काँक्रिटीकरण तसेच मिलन चौक ते मनकर्णिका नदी ड्रेनेज लाईन आदी कामांचा समावेश आहे. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन समस्या दूर करून रस्ते व मूलभूत नागरी सुविधांना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

आमदार काशिनाथ दाते यांनी पारनेर शहराच्या विकासासाठी नागरिकांच्या मागण्या आणि स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देऊन आवश्यक त्या सर्वच कामांना टप्प्याटप्प्याने गती दिली जाईल. रस्ते, ड्रेनेज व इतर मूलभूत सुविधांच्या माध्यमातून शहर अधिक सुस्थितीत आणि नागरिकांसाठी सोयीचे करण्याचा आपला प्रयत्न राहील, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत दादा गायकवाड, राहुल पाटील शिंदे, वसंतराव चेडे, उद्योजक दिलीप शेठ दाते, नगरसेवक कांतीलाल ठाणगे, अशोकराव चेडे, पारनेर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष राजूशेठ औटी, महीलाध्यक्षा कविता औटी, उपाध्यक्ष सुनील गाडगे, उद्योजक विठ्ठल कावरे, माऊली औटी, वडनेर हवेलीचे सरपंच लहू भालेकर, दिगंबर पुजारी, सोनाबाई चौधरी, सुनीता सोबले, प्रमिला चेडे, रेखा चेडे, अनुराधा पवळे, ऋतुजा औटी, प्रियंका औटी, कविता औटी, उषा झंजाड, निलम गोसावी, राणी सोबले, उज्वला शेरकर, गायत्री सोनवणे आदी मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपरी सांडस परिसरात देशी बनावटीचे पिस्टल जप्त

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२९, लोणीकंद (पुणे) :** बेकायदेशीररीत्या देशी बनावटीचे पिस्टल बाळगून वाडेबोल्हाई येथे फायरिंगचा सराव केल्याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी पिंपरी सांडस येथील दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी कारवाईदरम्यान एक पिस्टल आणि एक राऊंड जप्त केला आहे.

याप्रकरणी पोलिस अंमलदार सुधीर शिवले यांनी फिर्याद दिली असून ऋषीकेश वामन भोरडे (वय २७, रा. पिंपरी सांडस) आणि प्रणव

संदीप भोरडे (वय १९, रा. पिंपरी सांडस) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मिळालेल्या माहिती नुसार, लोणीकंद पोलिस ठाण्याच्या तपास पथकाला गोपनीय बातमीदारा मार्फत ऋषीकेश भोरडे याच्याकडे पिस्टल असल्याची माहिती मिळाली. या पिस्टलच्या सहाय्याने त्याने मित्राच्या मदतीने वाडेबोल्हाई परिसरात रात्रीच्या वेळी फायरिंगचा सराव केल्याची माहितीही पोलिसांना मिळाली होती. संशयित ऋषीकेश भोरडे याला पोलिसांनी ताब्यात घेतले.त्याच्या घराची झडती घेतली असता देशी बनावटीचे एक पिस्टल आणि त्यामध्ये एक राऊंड आढळून आले. सदर पिस्टल व राऊंड जप्त करण्यात आले आहे. त्याने प्रणव भोरडे याच्यासोबत वाडेबोल्हाई येथे सराव केल्याचे सांगितले. संबंधितांनी पिस्टल बाळगून फायरिंगचा सराव केल्याने दोघांवर लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## उद्या 'हर हर महादेव च्या' जयघोषात ढोकेश्वर दुमदुमणार



### श्री. ढोकेश्वर यात्रेनिमित्त विशाल भंडाऱ्याचे आयोजन...

**१८ वर्षांपासून विशाल भंडाऱ्याची परंपरा कायम**

श्रावणी सोमवार यात्रेनिमित्त सकाळी सहा वाजता श्री.ढोकेश्वराचे दर्शन झाल्यानंतर खिचडी महाप्रसादाला सुरूवात होते. सायंकाळी पाच वाजेपर्यंत येणाऱ्या भाविकांना भक्तिभावाने पोटभर महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. ढोकेश्वरच्या साबुदाणा खिचडीचे एक वेगळेच वैशिष्ट्य आहे. शिवभक्तांसाठी हा खिचडी महाप्रसाद सोहळा श्रद्धा, सेवा आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडविणारा ठरणार आहे.

श्री ढोकेश्वर विशाल भंडारा या धार्मिक, सामाजिक महाप्रसाद उपक्रमाने यावर्षी अठरा वर्षांचा टप्पा पार केला असून ही परंपरा अशीच पुढे चालू राहणार आहे.

**– शिवाजी झावरे, श्री ढोकेश्वर विशाल भंडारा कमेटी**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त टाकळी ढोकेश्वर (ढोकी) येथील पुरातन पांडवकालीन लेणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री ढोकेश्वर महादेव मंदिरात तिसऱ्या सोमवार, दि.३१ ऑगस्ट रोजी समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर यांच्या वतीने पंचक्रोशीतील भाविकांसाठी भव्य विशाल भंडाऱ्याच्या माध्यमातून २२ क्विंटल साबुदाणा खिचडी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने ढोकेश्वर मंदिर परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले असून, हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत.

श्रावणातील शिवभक्तीची परंपरा जपत सोमवारी पहाटे ढोकी ते श्रीक्षेत्र ढोकेश्वर अशी भव्य कावड यात्रा काढण्यात येणार आहे.

ढोकी गावातील तरुणांनी गोदावरी नदीपात्रातून आणलेले पवित्र गंगाजल कावडीतून घेऊन तरूण भाविक ढोकी येथे दाखल होतील. त्यानंतर याच गंगाजलाने श्री ढोकेश्वर महादेवाचा जलाभिषेक करण्यात येणार आहे. 'हर हर महादेव'च्या जयघोषात होणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे ढोकेश्वर नगरी भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

कावड यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदिरात महाआरती, अभिषेक तसेच अन्य धार्मिक विधी होणार आहेत. तिसऱ्या श्रावणी सोमवार या पवित्र पर्वानिमित्त टाकळी ढोकेश्वर पंचक्रोशीसह महाराष्ट्रातून हजारो भाविक मंदिरात दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे.

भाविकांच्या सेवेसाठी आणि आदरातिथ्याच्या परंपरेतून टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने तब्बल २३ क्विंटल साबुदाणा खिचडी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

## बल्लारपूर पेपर मिलची १९.४३ हेक्टर आर. जमीन नगरपालिकेला द्या !

### नगराध्यक्षांनी केली जिल्हाधिकाऱ्यांना मागणी : लोकप्रतिनिधींना निवेदनाद्वारे केली आर्जव






**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. २९ विसापूर(चंद्रपूर) :** चंद्रपूर जिल्ह्यात बल्लारपूर शहर लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथील जागतिक दर्जाच्या पेपर मिल उद्योगाची १९.४३ हेक्टर जमीन शासन जमा करण्याचे नियोजन केले आहे. शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता, सदर जमीन नगरपालिकेला हस्तांतरित करून द्या, अशी मागणी जिल्हाधिकारी वसुमना पंत यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी केली. या निवेदनाच्या प्रतिलीपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार प्रतिभा धानेरकर, बल्लारपूरचे आमदार सुधीर मुनगंटीवार, कांग्रेसचे माजी विरोधी पक्षनेते आमदार विजय वड्डेटीवार यांच्यासह तालुका प्रशासनाला दिले आहे.

बल्लारपूर सर्वात मोठी नगरपालिका असून ब वर्ग दर्जाची आहे. औद्योगिक शहर असल्याने लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरातील भौगोलिक स्थितीचा विचार केला असता शहराच्या विकासासाठी व पायाभूत सुविधा निर्मिती करण्यासाठी जमीन महत्वाची आहे. एकीकडे बारमाही वाहणारी वर्धा नदी तर, दुसरीकडे वन विभाग आहे. परिणामी शहराच्या नियोजनबद्ध विकासात अडथळा येत आहे. भविष्यातील विकासाच्या दृष्टीने जमीन नगरपालिकेकडे असणे गरजेचे आहे.

बल्लारपूर पेपर मिलची १९. ४३ हेक्टर आर. जमीन शासन जमा झाली आहे. ती जमीन नगरपालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करावी. सदर जमीनीचा उपयोग शहरातील वाहनतळ, प्रधानमंत्री आवास योजना, बाजार,सार्वजनिक उद्यान, प्रशासकीय कार्यालय व इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी फायदेशीर ठरणार आहे. यास्तव पेपर मिलची १९. ४३ हेक्टर आर. जमीन जिल्हा प्रशासनाने बल्लारपूर नगरपालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करून द्यावी, अशी आग्रही मागणी बल्लारपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा डॉ. अलका वाढई, उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, माजी नगराध्यक्ष छाया मडावी, नगरसेवक भास्कर माकोडे यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अक्षराज






## शिक्षकांची शाळा भरो

भारतीय लोकशाहीची ताकद मुक्त, निष्पक्ष आणि विश्वासार्ह निवडणुकांमध्ये आहे. त्या दृष्टीने अचूक मतदार यादी तयार करणे हे निवडणूक आयोगाचे अत्यंत महत्त्वाचे आणि घटनात्मक कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा भारतीय राज्यघटनेने, तसेच बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (आरटीआई कायदा) यांनी दिलेला मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया आणि शिक्षण या दोन्ही राष्ट्रीय प्राधान्याच्या जबाबदाऱ्या आहेत. प्रश्न निवडणूक आयोगाच्या कामाला विरोध करण्याचा नाही; तर या दोन्ही जबाबदाऱ्यांमध्ये योग्य संतुलन राखण्याचा आहे.

चार ऑगस्ट २०२६ रोजी भारत निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाचा सुधारित कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमानुसार बीएलओमार्फत घरभेटी, मतदान केंद्रांच्या पुनर्रचनेचे काम, प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करणे, दावे-हरकती स्वीकारणे, त्यावर निर्णय घेणे आणि अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे, अशी प्रक्रिया २७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत चालेल. राज्यातील हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बीएलओ किंवा सहायक म्हणून पूर्ण क्षमतेने या कामात गुंतले आहेत. अनेक जिल्ह्यांमध्ये शाळेतील सर्व शिक्षकांना एसआयआर कामासाठी सहायक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. काही ठिकाणी मुख्याध्यापकही पूर्णवेळ या कामात आहेत. मग प्रश्न असा निर्माण होतो की, शाळा चालवायची कोणी? एक उदाहरण. सोलापूर शहरातील एका शाळेतील १७ शिक्षक, एक लिपिक आणि चार वर्ग-४ कर्मचारी यांना बीएलओ सहाय्यक म्हणून नियुक्त करण्यात आले. मुख्याध्यापकांनी शाळा बंद पडू नये म्हणून अर्धवेळ शाळा सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला; परंतु सर्व कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ शाळेतून कार्यमुक्त न केल्यामुळे त्यांनाच कारवाईची नोटीस देण्यात आली. तहसीलदार, शिक्षणाधिकारी आणि महानगरपालिका प्रशासनाकडे 'शाळा कशी चालवायची?' असा प्रश्न त्यांनी विचारला; मात्र ठोस उत्तर कोणाकडेच नव्हते. हीच परिस्थिती राज्यभरातील हजारो शाळांची आहे. या काळातच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा यांनुसार इयत्ता तिसरी, चौथी आणि सहावीसाठी नवीन पाठ्यपुस्तके आली आहेत. त्यात अनुभवाधारित शिक्षण, कौशल्याधारित अध्यापन, प्रकल्पाधारित अध्ययन, सतत मूल्यमापन आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण यावर भर देण्यात आला आहे. परंतु शिक्षकच वर्गात नसतील, तर नवीन शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे कशी साध्य होणार? काही जिल्ह्यांमध्ये या नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षणच पुढे ढकलण्यात आले आहे. दरम्यान, शिक्षण विभागाकडून नवसाक्षर सर्वेक्षण, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध, एमबीयूची पूर्तता, यूडायस, विविध स्पर्धा आणि इतर प्रशासकीय कामेही सुरूच आहेत. अशा परिस्थितीत दर्जेदार शिक्षणाची अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. याचा परिणाम पालकांच्या मानसिकतेवरही होत आहे. सोबतच समाजात हा समज दृढ होत आहे, की सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये शिक्षक कायम शासकीय कामात व्यग्र असतात. यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम पालक खासगी शाळांकडे वळत आहेत. मात्र, ग्रामीण, आदिवासी, बहुजन आणि शहरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांना हा पर्याय उपलब्ध नसतो. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (आरटीई कायदा) मधील कलम २७ या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहे. या कलमानुसार शिक्षकांना नियमित अध्यापनापासून दूर ठेवणारी अशैक्षणिक कामे देऊ नयेत, अशी स्पष्ट भूमिका घेण्यात आली आहे. शिक्षकांचा मुख्य वेळ विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी उपलब्ध राहावा, हा या तरतुदीचा उद्देश आहे. तथापि, या कलमात तीन अपवाद नमूद करण्यात आले आहेत –

१) दशवार्षिक जनगणना, २) आपत्ती निवारणाची कामे आणि ३) स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभेच्या निवडणुकांशी संबंधित कामे. त्यामुळे निवडणूक कामासाठी शिक्षकांची नियुक्ती कायदेशीरदृष्ट्या शक्य असली, तरी त्या कामामुळे विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापन, परीक्षा, मूल्यमापन आणि शिक्षणाचा दर्जा बाधित होणार नाही, याची जबाबदारी शासन आणि निवडणूक प्रशासनाची आहे.

आरटीई कायद्याचा मूळ उद्देश प्रत्येक बालकाला अखंडित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, हा असल्यामुळे शिक्षकांच्या निवडणूक कामाचे नियोजनही त्याच तत्त्वाला अनुसरून केले जाणे आवश्यक आहे. याच संदर्भाने प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने आदेश जारी केला. शिक्षकांवर वाढणाऱ्या अशैक्षणिक कामांचा भार कमी करून त्यांना अध्यापनासाठी अधिक वेळ मिळावा, तसेच शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम २७ ची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने शैक्षणिक व अशैक्षणिक कामांचे स्पष्ट वर्गीकरण या निर्णयाद्वारे केले गेले.

**– डॉ. माधव सूर्यवंशी**

# निसर्गापुढे मानव हतबल; तरीही जगण्याची जिद्द अमर!

नेपाळमधील तिबेटच्या सीमेवर असलेल्या चार जिल्ह्यांमध्ये बुधवारी अचानक आलेल्या पुरामुळे ४५० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून, २,००० पेक्षा अधिक जण बेपत्ता झाले आहेत. तिबेटमध्ये सुरू असलेली अतिवृष्टी आणि हिमस्खलनामुळे नद्यांचे प्रवाह बदलले आणि त्याचा मोठा फटका नेपाळला बसला. या महापुरामुळे तेथील पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अनेक रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत.

तिबेट-नेपाळ सीमा भागात भूकंप होऊन हिमसंचय खचला आणि बर्फाचे मोठे खडक नेपाळमधील लेंडे खोला नदीत आल्यामुळे पूर आला असावा, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. लेंडे खोला नदी नेपाळ आणि तिबेट या दोन्ही देशांमधून वाहते. ती भोटे कोशी नदीची उपनदी आहे.

नेपाळमधील या महापुराने केलेला विध्वंस पाहिल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवतेमानव कितीही प्रगत झाला, तरी तो निसर्गापुढे अखेर हतबलच आहे. मानवी क्षमतांना मर्यादा आहेत, हे माणसाला माहीत असते; मात्र त्या मर्यादांची सतत जाणीव ठेवून जगणेही शक्य नसते. कारण आपण सतत भूकंप, महापूर, अंतरिक्षातून पृथ्वीवर अचानक येऊन आदळू शकणाऱ्या खगोलीय वस्तूंपासून होणारा विध्वंस, कोरोना विषाणूसारख्या महामारी, वादळे आणि इतर नैसर्गिक संकटांचा विचार करत बसलो, तर आपले दैनंदिन जगणेच कठीण होऊन बसेल.

म्हणूनच येणाऱ्या प्रत्येक नैसर्गिक संकटाला धैर्याने तोंड देणे एवढेच आपल्या हातात आहे. त्याचबरोबर संकटाची चाहूल लागताच आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य सुरू करणे, संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी तत्परतेने उपाययोजना करणे आणि संकटग्रस्तांना सुरक्षित स्थळी पोहोचवणे, हेही आपण करू शकतो. संकटाच्या काळात होणारी जीवित आणि मालमत्तेची हानी शक्य तितकी कमी करण्यासाठी प्रयत्न करणे, हे सक्षम आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. अर्थात, यामध्ये मानवी जीविताचे रक्षण हीच सर्वोच्च प्राथमिकता असली पाहिजे.

मानवी जीवनात काही संकटे नैसर्गिक असतात, तर काही संकटे मानवनिर्मित असतात. दंगल, आग, युद्धे, अपघात यांसारख्या घटना मानवी चुका, निष्काळजीपणा किंवा जाणूनबुजून विध्वंस करण्याच्या प्रवृत्तीतून घडतात. निसर्गाच्या संकटांवर आपले नियंत्रण नसले, तरी मानवनिर्मित संकटे कमी



करण्याची जबाबदारी मात्र माणसाचीच आहे.

मानवी जीवन अनमोल आहे. प्रत्येक व्यक्तीचा पहिला अधिकार म्हणजे जगण्याचा अधिकार. 'सिर सलामत तो पगडी पचास' या म्हणीप्रमाणे, जिवंत राहिलो तरच पुढील अनेक संधींचे दरवाजे आपल्यासाठी खुले होतात. खरं तर, जीवन स्वच्छंदीपणे जगणे हीसुद्धा एक मोठी मौज आहे. मिळणारा प्रत्येक क्षण, प्रत्येक श्वास आणि प्रत्येक वेळी मनात निर्माण होणारे विचारांचे भावतरंग हीदेखील निसर्गाचीच देणगी आहे.

मानवी जगण्याबाबत तत्त्ववेत्त्यांपासून जीवशास्त्रज्ञ, वैद्यकीय व्यावसायिक, कवी आणि लेखकांपर्यंत अनेकांनी आपल्या-आपल्या कार्यक्षेत्रानुसार विविध दृष्टिकोन मांडले आहेत. कवी आणि लेखकांनी जगणे अर्थपूर्ण करण्यावर विशेष भर दिला आहे. म्हणूनच कवी मंगेश पाडगावकर यांच्या 'शतदा प्रेम करावे' या कवितेतील शेवटच्या ओळी जगण्याविषयीची विलक्षण सकारात्मक भावना व्यक्त करतात

**या ओठांनी चुंबुनि घेईन हजारदा ही माती**<br>
**अनंत मरणे झेलून घ्यावी इथल्या जगण्यासाठी**<br>
**इथल्या पिंपळपानावरती अवघे विश्व तरावे**<br>
**या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे**

जगणे स्वाभिमानाचे असावे. पराधीनतेत जगणे म्हणजे जिवंतपणी मृत्यू भोगण्यासारखे आहे, असेही अनेक विचारवंतांनी मानले आहे. निसर्ग सर्वशक्तिमान आहे. तो माणसाला आनंद देतो, तसेच दुःख आणि संकटेही देतो. निसर्गाच्या या द्वंद्वात्मक रूपाचा स्वीकार करूनच माणसाला जीवनाचा खरा अर्थ समजून घेता येतो.

तत्त्ववेत्त्यांनी मानवी विचारप्रक्रियेचा सखोल अभ्यास केला आहे. मानवी विचारचक्र हे असे अद्भुत साधन आहे, जे सतत फिरत असते आणि त्यातून नवनिर्मितीबरोबरच अफाट आणि अचाट कल्पनांचा जन्म होतो. माणसाचे जीवन अशाश्वत आहे आणि मृत्यू त्याचा सतत पाठलाग करत असतो. तरीही माणूस जगण्यासाठी धडपडतो. या धडपडीमागची प्रेरणा समजून घेणे म्हणजेच मानवी जीवनाचा अन्वयार्थ समजून घेणे होय.

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी माणसाच्या या अशाश्वत जीवनाचे आणि जगण्यासाठीच्या संघर्षाचे अत्यंत प्रभावी वर्णन १९५८ मध्ये झालेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनातील आपल्या भाषणात केले आहे. ते म्हणतात

माणूस जगतो का? नि जगण्यासाठी एवढा धडपडतो का? याचा विचार करणे जरुरी आहे. त्या धडपडणाऱ्या पतिताला आम्ही भित्रा समजतो, तो उंच गगनाला गेलेल्या विद्युतमय मनोऱ्यावर उभे राहून विजेच्या तारा जोडतो, खाणीत उभ्या कड्यावर चढून सुरुंगाला पेट देतो किंवा पोलादाच्या रस करणाऱ्या भट्टीवर तो निर्भय वावरतो आणि या सर्व ठिकाणी मृत्यू त्याची वाट पाहत असतो. कधी कधी त्याची आणि मृत्यूची गाठ पडून हा दलित कष्ट करीत करीत मरण पत्करतो. ही जगण्याची नि मरण्याची आगळी रीत आहे. ती लेखकाने समजून घ्यावी. सुरूंगाला पेट देता देता किंवा पोलादाच्या रसात बुडून मरणे, नाही तर विजेच्या धक्क्याने मरणे, दिवाळे निघाले म्हणून शेअर बाजारात मरणे या मरणातील अंतर लेखकाने मोजून पाहावे नि श्रेष्ठ मरण कोणते ते निश्चित ठरवावे.

मानवी जगण्याचा आणि मरण्याचा अन्वयार्थ इतक्या अजोड पद्धतीने मांडणारे अण्णाभाऊ साठे हे मानवतावाद जपणारे महान लेखक होते. म्हणूनच त्यांच्या साहित्याचा आणि विचारांचा प्रभाव पुढील अनेक शतके अनेक पिढ्यांवर राहणार आहे.

वैद्यकीय क्षेत्रातही मानवी जीवनाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी डॉक्टर आणि परिचारिका शेवटच्या क्षणापर्यंत आटोकाट प्रयत्न करतात. एखाद्या दुर्धर आजाराने शेवटची घटका मोजणाऱ्या रुग्णाचे हृदय बंद पडले, तरी त्याला पुन्हा जीवनदान मिळावे यासाठी वैद्यकीय पथक शेवटपर्यंत प्रयत्नशील राहते. एका जीवासाठी केलेला प्रत्येक प्रयत्न हा माणुसकीचा विजय असतो.

कालच्या महापुरात एका ९७ वर्षीय वृद्ध आजींना रेस्क्यू टीमने जिवंत आणि सुखरूप बाहेर काढल्याची चित्रफीत पाहायला मिळाली. त्या आजींच्या चेहऱ्यावरचा आनंद एखाद्या विजेत्या योद्ध्याच्या आनंदासारखा वाटत होता. संकटातून सुखरूप बाहेर पडण्याचा तो क्षण केवळ एका व्यक्तीच्या बचावाची घटना नव्हती; तो जगण्याच्या अदम्य इच्छाशक्तीचा विजय होता. अशा अनेक हृदयस्पर्शी कहाण्या पुढील काही दिवसांत आपल्याला पाहायला आणि ऐकायला मिळतील.

निसर्गाची शक्ती अफाट आहे. मानवाने विज्ञानाच्या बळावर निसर्गाची अनेक रहस्ये उलगडली आहेत; आकाशाला गवसणी घातली, समुद्राच्या तळाशी पोहोचला आणि अंतरिक्षातही आपली पावले उमटवली. तरीही निसर्गाच्या एखाद्या अनपेक्षित रूपासमोर त्याची सारी ताकद क्षणात अपुरी ठरू शकते. म्हणूनच निसर्गावर विजय मिळवण्यापेक्षा निसर्गासोबत समतोल साधून जगणे अधिक महत्त्वाचे आहे.

महापूर असो, भूकंप असो, वादळ असो किंवा महामारीसंकट कोणत्याही रूपात येऊ शकते. संकट येणे आपल्या हातात नसले, तरी संकटाच्या वेळी माणूस म्हणून एकमेकांच्या मदतीला धावून जाणे नक्कीच आपल्या हातात आहे.

निसर्ग मोठा आहे, संकटे मोठी आहेत; पण जगण्याची माणसाची जिद्द त्याहून मोठी आहे.

प्रत्येक श्वास ही निसर्गाची देणगी आहे आणि प्रत्येक जीव वाचवणे ही मानवतेची जबाबदारी आहे.

**– किशोर जाधव, सोलापूर**<br>
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

## द विझार्ड

ध्यानचंद जन्मदिवस<br>
क्रीडा दिन जागतिक<br>
खेलरत्न पुरस्कारही<br>
नामे त्यांचे सांकेतिक

तीनवेळा स्वर्ण पदक<br>
गाजविले ऑलिंपिक<br>
जर्मनीला हरवे जेंव्हा<br>
हिटलर होई अगतिक

हॉकी स्टीकशी चेंडूची<br>
जणू चुंबकी जवळिक<br>
चारशे गोल सर्वोच्च ते<br>
क्रीडाजगते आगळीक

घालून देई खासआदर्श<br>
कसे खेळायचे सांघिक<br>
नवपिढी व्हिडिओ पाहे<br>
खेळातरंगत अलौकिक

सामनाहरेक नेत्रदिपक<br>
शास्त्रशुद्ध ते वैधानिक<br>
नाळ जुळली मैदानाशी<br>
स्नेह बंधन ते भावनिक

हॉकी स्टीक भारावली<br>
शक्ती जणू असे दैविक<br>
जगता बनवी भावनिक<br>
प्रेक्षकदर्शक हो भाविक

पारणे फेडती डोळ्यात<br>
स्तब्ध निशब्द रे रसिक<br>
ना भुतो ना भविष्यती<br>
खेळ हरेक ऐतिहासिक

**– हेमंत मुसरीफ, पुणे**<br>
**९७३०३०६९९६**

# नेपाळचा जलप्रलय भारतासाठी धोक्याची घंटा!



नेपाळमध्ये अतिवृष्टी, भूस्खलन, हिमनदी फुटणे आणि अचानक आलेल्या महापुरामुळे निर्माण झालेली परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. नद्या दुथडी भरून वाहत असून अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. डोंगराळ प्रदेशातील रस्ते, पूल, घरे आणि इतर पायाभूत सुविधा पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे बाधित झाल्या आहेत. या नैसर्गिक आपत्तीने नेपाळसमोर मोठे संकट उभे केले असले, तरी भारतासाठीही हा गंभीर इशारा आहे.

हिमालय हा केवळ नेपाळचा किंवा भारताचा भूभाग नाही; तो संपूर्ण दक्षिण आशियाच्या पर्यावरणीय सुरक्षिततेचा आधार आहे. हिमालयातून उगम पावणाऱ्या अनेक नद्या भारत आणि नेपाळमधून वाहतात. त्यामुळे नेपाळमध्ये घडणाऱ्या हवामानविषयक घटनांचा परिणाम सीमावर्ती भारतीय भागांवर होण्याची शक्यता कायम असते. म्हणूनच नेपाळमधील जलप्रलयाकडे केवळ शेजारच्या देशातील आपत्ती म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही.

फ़अतिवृष्टी, ढगफुटी, हिमनद्या वितळण्याचा वाढता वेग आणि हिमनदीतील तलाव फुटण्याच्या घटना या बदलत्या हवामानाचे गंभीर संकेत आहेत. हिमालयीन प्रदेशात तापमानवाढीमुळे पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. अशा परिस्थितीत अचानक मोठ्या प्रमाणावर पाणी खाली येते आणि नदीकाठच्या वस्त्यांना त्याचा फटका बसतो. डोंगराळ भागातील अरुंद दऱ्या आणि नदीखोऱ्यांमध्ये हा धोका आणखी वाढतो.

फ़नेपाळमधील या आपत्तीत भारताने मदतीचा हात पुढे करणे ही केवळ शेजारधर्माची बाब नाही, तर मानवी कर्तव्याचीदेखील आहे. आपत्तीच्या काळात अन्न, औषधे, बचाव साहित्य, पाणी, तात्पुरता निवारा आणि अन्य आवश्यक सामग्री उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर भारत आणि नेपाळने हिमालयीन प्रदेशातील आपत्ती व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी संयुक्त यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे.

फ़विशेषतः नदीच्या पाण्याची पातळी, अतिवृष्टी, हिमनदीतील बदल आणि संभाव्य पूर याबाबत रिअल-टाइम माहितीची देवाणघेवाण झाली पाहिजे. सीमावर्ती भागातील नागरिकांना वेळेवर इशारा मिळाला, तर अनेक जीव वाचवता येऊ शकतात. केवळ आपत्ती घडल्यानंतर मदत करण्याऐवजी आपत्ती येण्यापूर्वीच सज्ज राहणे ही काळाची गरज आहे.

फ़या घटनेतून भारताने स्वतःसाठीही महत्त्वाचा धडा घेण्याची आवश्यकता आहे. हिमालयीन राज्यांमध्ये अनियंत्रित बांधकाम, नदीपात्रांवरील अतिक्रमण, डोंगर उतारांवरील बेसुमार विकास आणि पर्यावरणाचा विचार न करता उभारल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधा भविष्यात धोकादायक ठरू शकतात. विकास आवश्यक आहे; मात्र निसर्गाच्या क्षमतेचा विचार करून केलेला विकासच शाश्वत विकास ठरतो.

फ़हिमालय हा अत्यंत संवेदनशील प्रदेश आहे. येथे रस्ते, धरणे, पर्यटन प्रकल्प आणि वसाहती उभारताना पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. नदीला तिचा नैसर्गिक प्रवाह मिळणे, पूरक्षेत्रात अनावश्यक बांधकाम टाळणे, जंगलांचे संवर्धन करणे आणि डोंगर उतारांचे संरक्षण करणे याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

फ़हवामान बदल ही आता भविष्यातील समस्या राहिलेली नाही. त्याचे परिणाम आजच जाणवत आहेत. त्यामुळे भारताने आपत्ती व्यवस्थापनाच्या पारंपरिक पद्धतींपलीकडे जाऊन पूर्वसूचना प्रणाली, उपग्रह निरीक्षण, हवामान अंदाज, नदी निरीक्षण आणि स्थानिक प्रशासनाचे प्रशिक्षण अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.

नेपाळच्या आपत्तीने माणूस आणि निसर्ग यांच्यातील बिघडत चाललेला समतोल पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. संकटाच्या काळात भारताने नेपाळला सर्वतोपरी मदत करावीच; परंतु त्याचबरोबर या आपत्तीतून स्वतःच्या भविष्यासाठीही धडा घ्यावा.

निसर्गाला आव्हान देऊन विकास साधता येत नाही. निसर्गाचा सन्मान करून, पर्यावरणाचे रक्षण करत आणि आपत्तीपूर्व तयारी मजबूत करत केलेला विकासच खऱ्या अर्थाने सुरक्षित विकास आहे. नेपाळच्या भीषण जलप्रलयाने भारताला दिलेला हा इशारा वेळीच समजून घेण्याची गरज आहे.

**– श्याम ठाणेदार**<br>
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### सीएसआर फंडातून सी.एम.एल कंपनी मार्फत पेवर ब्लॉक चे भूमिपूजन



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२९, सुपा (अहिल्यानगर)** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणगाव येथे आज शनिवार, दिनांक २९ ऑगस्ट २०२६ रोजी एम आयडीसी म्हसने फाटा येथील नाम ांकित कंपनी उचङ मार्फत सीएसआर फंडातून पेवर ब्लॉक बसवण्याचे भूमिपूजन पार पडले. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी तसेच इतर कार्यक्रमासाठी उपयोगी होईल अशा पद्धतीने फेवर ब्लॉक बसवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यावेळी कंपनीचे प्लॅट हेड विठ्ठल मुक्कनवार, एच.आर.हेड संजय टेनी, प्रोजेक्ट सिनियर ऑफिसर अश्विनकुमार शेळके, कॉन्ट्रॅक्टर अमोल गाडेकर उपस्थित होते. यावेळी सरपंच महेशकाका देशमुख, प्राध्यापक चंद्रकांत शिंदे , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्राजक्ता चहाळ, शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना आसने. उपा.पठारे संदीप , रुपाली गंधाडे . हे उपस्थित होते.

पठारे संदीप यांच्याकडून शाळेतील गरजांविषयी कंपनी कडे माहिती देण्यात आली. तसेच शिंदे सर यांनी आपल्या मनोगतामध्ये शाळेतील विविध कामांविषयी माहिती देण्यात आली. तसेच कंपनीच्या एच आर हेड संजय टेनी यांनी शाळेविषयी आपले मत व्यक्त करत यापुढे ही शाळेच्या अडचणींकडे लक्ष देण्याचे आश्वासन दिले गेले. शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना असणे यांनी सर्वांचे आभार मानले.

### वळंकी येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२९, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मौ.वळंकी येथे दिनांक २८ ऑगस्ट २०२६ रोजी साहित्य सम्राट लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे यांची १०६ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने जयंती मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथील पंढरीनाथ कांबळे माजी पंचायत समिती सदस्य

मुखेड हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती मनोज कांबळे दापकेकर, माधव कांबळे दापकेकर, बालाजी कांबळे दापकेकर तर राजू मठपती, आनंद पाटील गोजेगावे, सरपंच गुणवंत पाटील, बिरादार रामराव पाटील , गावातील प्रतिष्ठित नागरीक व समाज बांधव उपस्थित होते. ही जयंती मोठ्या उत्साहात साजरी व यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणारे जयंती मंडळाचे कार्यकर्ते प्रशांत भाऊ गुडमे, सुर्यकांत भाऊ गुडमे, संदिप गुडमे,संदिप गडये, विजय गुडमे, गोविंद गुडमे, बालाजी शंकर गुडमे, शिवाजी गुडमे, राम गुडमे, अजय गुडमे, मनोज गुडमे, संतोष गुडमे, प्रकाश गुडमे, परमेश्वर, राजकुमार गुडमे, छगन गुडमे, दिपक सोनावणे, अशोक सोनावणे, रमेश सोनावणे, आकाश सोनावणे, रमाकांत गुडमे, चांदु सोनावणे, प्रविण गुडमे, संगमेश्वर गुडमे, सुभाष सोनावणे, विकास सोनकांबळे, चंद्रकांत सोनावणे, सिध्दार्थ गायकवाड, सुरज गायकवाड, शिवाजी गायकवाड, बालाजी गुडमे, माधव गोपाळ गुडमे होते. सूत्रसंचलन राजकुमार गायकवाड यांनी केले तर प्रशांत गुडमे यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले.

### कल्पवृक्ष पतसंस्थेचा सभासदांना १३% लाभांश



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.२९, फुरसुंगी (पुणे) :** भेकराई नगर येथील कल्पवृक्ष ग्रा.बि.शेती सह पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अपेक्षा पॅलेस येथे उत्साहात पार पडली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब सूर्यवंशी, राजेंद्र जैनक व संचालकांनी सरस्वती पूजन द्वीप प्रज्वलाने केले. सभेचे सूत्रसंचालन प्रास्ताविक नगरसेवक रमेश आप्पा निवंगुणे यांनी केले. यावेळी महाराष्ट्राचे मा.उपमुख्यमंत्री कै. स्व.अजित दादा पवार साहेब तसेच दिवंगत सभासद यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यक्ष नानासाहेब सूर्यवंशी म्हणाले की संस्थेला या वर्षांमध्ये लेखापरीक्षण वर्ग अ मिळाला असून संस्थेला २ कोटी ११ लाख नफा झाला असून संस्थेने १३% लाभांश दिला आहे. संस्थेचे सर्व निधी १२ कोटी ६१ लाख रुपये आहे ठेवी ३४ कोटी आहेत.

यावेळी फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संतोष भाऊ सरोदे, पुरंदर तालुक्याचे मा.सभापती रमेश आबा मोकाशी, फुरसुंगी ग्रामोपाध्याय नंदू काका राहणे, सामाजिक कार्यकर्ते सतीश भाऊ जगताप यांना कल्पवृक्ष समाजभूषण पुरस्कार,नगरसेवक रमेश आप्पा निवंगुणे यांनाकल्पवृक्ष भूषण पुरस्कार, नगरसेवक गणेश आबा ढोरे, उपनगराध्यक्ष ओंकार शेठ कामठे, नगरसेवक गटनेते प्रशांत शेठ भाडळे, नगरसेवक गणेश शेठ कामठे, नगरसेविका गटनेत्या अमृताताई कामठे व नाना कामठे यांना कल्पवृक्ष गौरव पुरस्कार तसेच फुरसुंगी ग्रा.सदस्य राजाभाऊ सूर्यवंशी,अरुण आटोळे यांना आदर्श संचालक पुरस्कार, मनीषा नामदेव गारगोटे यांना कल्पवृक्ष क्रीडा पुरस्कार व शिरीष जगताप, कासम पठाण, सुरेश चव्हाण या सभासदांना आदर्श ज्येष्ठ सभासद पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

तसेच दहावी व बारावी मधील विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी नगरसेविका सुकन्या प्रकाशकाका शेवाळे प्राचीताई देशमुख संस्थेचे संचालक तानाजी कामठे, अरविंद वाघिरे, वामन चव्हाण, दत्तात्रय हरपळे, रतन वाजे व्यवस्थापक प्रदीप भापकर कर्मचारी वर्ग दैनंदिन एजंट व मोठ्या प्रमाणात संस्थेचे सभासद उपस्थित होते.

## राखीतून जपला आपुलकीचा धागा; एम.ई.एस.च्या विद्यार्थिनींचा अनोखा उपक्रम





**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२८, महाबळेश्वर :** रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नव्हे, तर समाजातील आपुलकी, विश्वास आणि बंधुभावाचे नाते अधिक घट्ट करणारा उत्सव आहे. याच भावनेतून एम.ई.एस. इंग्लिश मीडियम सेकंडरी स्कूलच्या चौथी ते दहावीच्या विद्यार्थिनींनी रक्षाबंधनानिमित्त एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविला.

विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने आकर्षक राख्या तयार करून शिक्षकांसमवेत महाबळेश्वर पोलीस स्टेशन आणि नगरपालिका कार्यालयाला भेट दिली. पोलीस अधिकारी-कर्मचारी तसेच नगरपालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मनगटावर या विद्यार्थिनींनी प्रेमाने राख्या बांधत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

**पोलिसांच्या मनगटावर प्रेमाची राखी...**

महाबळेश्वर पोलीस स्टेशनमध्ये पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे तसेच उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांना विद्यार्थिनींनी स्वनिर्मित राख्या बांधल्या. चिमुकल्या विद्यार्थिनींच्या या अनोख्या उपक्रमामुळे पोलीस कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावरही आनंद दिसून आला. पोलिसांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

**नगरपालिकेतही उमटला बंधुभावाचा संदेश**

त्यानंतर विद्यार्थिनींनी महाबळेश्वर नगरपालिका कार्यालयात जाऊन नगराध्यक्ष सुनील शिंदे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांना राख्या बांधल्या. शाळेतील विद्यार्थिनींनी नगराध्यक्ष सुनील शिंदे यांचे औक्षण करून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. नगराध्यक्ष शिंदे यांनीही सर्व विद्यार्थिनींचे अत्यंत आपुलकीने स्वागत केले. राखी बांधल्यानंतर त्यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची विचारपूस केली, तसेच सर्व विद्यार्थिनींना भेटवस्तू देऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींच्या या प्रेमळ उपक्रमामुळे नगरपालिका कार्यालयातही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

राखीचा धागा फक्त मनगटावर नाही, तर माणसामाणसांच्या नात्यांमध्ये बांधला जातो, हा सुंदर संदेश या उपक्रमातून विद्यार्थिनींनी दिला.

स्वनिर्मित राख्यांमधून सामाजिक सलोखा, कृतज्ञता, बंधुभाव आणि समाजाप्रती जबाबदारी यांची जाणीव निर्माण करण्याचा विद्यार्थिनींचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरला. पोलीस अधिकारी, नगरपालिका अधिकारी-कर्मचारी आणि शिक्षकांनी विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे मनापासून अभिनंदन केले.

## पूना कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२८, महाबळेश्वर :** अंजुमन खैरुल इस्लाम संचालित पूना कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, कॅम्प, पुणे येथे राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. खेळेल भारत, जिंकेल भारत या घोषवाक्याखाली FIT India Club, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २९ ऑगस्ट दरम्यान आंतरवर्गीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

भारतीय हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या क्रीडा महोत्सवात २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, बुद्धिबळ, बास्केटबॉल, कॅरम, थ्रो बॉल, बॅडमिंटन तसेच वेटलिफ्टिंग/पॉवरलिफ्टिंग अशा आठ क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली.

क्रीडा महोत्सवाची सुरुवात २१ ऑगस्ट रोजी व्हॉलीबॉल स्पर्धेने झाली. संपूर्ण स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि खिलाडूवृत्तीचे उत्कृष्ट दर्शन घडविले. FIT India अभियानातून नियमित व्यायाम, शारीरिक तंदुरुस्ती आणि निरोगी जीवनशैलीचा संदेशही देण्यात आला.

**विजेत्यांचा गौरव...**

२९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या ओपन-एअर ऑडिटोरियममध्ये पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. प्रभारी प्राचार्य डॉ. इक्बाल एन. शेख, उपप्राचार्य डॉ. गुलाब पठाण, जिमखाना समितीचे उपाध्यक्ष मुसर्रफ हुसेन आणि शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. अयाज हुसेन शेख यांच्या हस्ते विजेत्यांना पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात क्रीडेचे महत्त्व अधोरेखित करत, आत्मविश्वास, शिस्त, नेतृत्व आणि सकारात्मक दृष्टिकोन घडविण्यासाठी क्रीडा अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, जिमखाना समिती, FIT India Club, IQAC आणि विद्यार्थी स्वयंसेवकांच्या सहकार्यामुळे हा क्रीडा महोत्सव यशस्वीरीत्या पार पडला. खेळेल भारत, जिंकेल भारत या संदेशासह राष्ट्रीय क्रीडा दिनाचा उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## पालशेतची अखंड परंपरा : श्री आगडी देवीच्या कृपेने दर्याराजाला मानाचा नारळ अर्पण



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२८, पालशेत (गुहागर) :** यत्र धर्मस्तत्र जय: जिथे धर्माचे आचरण होते, तिथे संस्कृती जिवंत राहते.

कोकणची ओळख म्हणजे निसर्ग, भक्ती आणि परंपरा. हीच परंपरा पालशेत गावाने अनेक दशके अखंड जपली आहे. समुद्राच्या लाटांमध्ये नारळ अर्पण करत जीवनात येवो शांततेची गंगा, या श्रद्धेने गुहागर तालुक्यातील पालशेत येथील जागृत देवस्थान श्री आगडी देवी नारळी पौर्णिमा जागर रुपे सोहळा यंदाही मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाला.

यावर्षी या सोहळ्याचे आयोजन बुधवार दि. २६ ऑगस्ट व गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले होते.

'समुद्रः वसुधा भूषणम', समुद्र हा पृथ्वीचा अलंकार आहे आणि दर्याराजा हा कोळी बांधवांचा पालनकर्ता आहे. त्याच्या कृपेशिवाय मासेमारी नाही आणि उदरनिर्वाह नाही. म्हणूनच नारळी पौर्णिमा हा केवळ सण नाही, तर कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.

**सोहळ्याचे दिव्य आकर्षण – मानाच्या नारळाची मिरवणूक**

गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८.०० वा. देवीचे दर्शन घेऊन दुपारी २.०० वा. श्री आगडी देवी मंदिर ते पालशेत समुद्र अशी मानाचा नारळ दर्याराजाला विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. हीच मिरवणूक या सोहळ्याचा आत्मा ठरली.

'सागरे सर्वतीर्थानि' – सागरात सर्व तीर्थांचे वास्तव्य असते,या भावनेने ही मिरवणूक निघाली.

या मिरवणुकीत पालशेत येथील खारवी समाज बंधू-भगिनींनी पारंपारिक वेशात, डोक्यावर टोपी, हातात भगवा ध्वज घेऊन मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ढोल-ताशाच्या गजरात, शंखनादात आणि दर्या राजा की जय, श्री आगडीदेवी मातेचा उदो उदो च्या जयघोषात संपूर्ण आसमंत भक्तिमय झाला होता.

परंपरा ही केवळ जुनी प्रथा नसते, तर ती आपल्या पूर्वजांनी दिलेली शिदोरी असते. जी जपली तरच पुढची पिढी घडते.

महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि लहान बालगोपाळांनी या मिरवणुकीत मोठ्या आनंदाने सहभागी होऊन दर्याराजाला सोन्याचा श्रीफळ अर्पण करून आम्हाला सुखी ठेव, पोटाला भरपूर मासोळी दे, वादळ-वारे शांत ठेव अशी आर्त प्रार्थना केली.

अखेर समुद्र किनारी विधिवत पूजा करून मानाचा नारळ विसर्जन करण्यात आला आणि या दोन दिवसीय जागर रुपे सोहळ्याची मंगलमय सांगता झाली. पालशेतकरांनी पुन्हा एकदा दाखवून दिले की आधुनिकतेच्या युगातही आम्ही आमची संस्कृती विसरलो नाही.

## श्रावण पौर्णिमेनिमित्त खापरखेड्यात धम्मचरीका उत्साहात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, खापरखेडा (नागपूर) :** खापरखेडा येथील भीमनगर, वॉर्ड क्रमांक ३ मधील सत्यशील बुद्ध विहार येथे वर्षावास अधिष्ठानानिमित्त श्रावण पौर्णिमेचा कार्यक्रम विविध धम्म उपक्रमांनी उत्साहात पार पडला. यावेळी पूज्य भंतेजी चंद्रप्रभाव महाथेरो यांच्या प्रमुख उपस्थितीत धम्मचरीकेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी तथागत भगवान बुद्ध तसेच राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांना पुष्प अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर भंतेजी चंद्रप्रभाव महाथेरो यांच्या नेतृत्वाखाली नगरातून धम्मचरीका 'भिक्खवे चारिकं' या धम्मगाथेचे पठण करण्यात आले. धम्मचरीकेची सांगता करून सर्वजण बुद्ध विहारात परतले. यानंतर उपस्थित उपासक उपासिकांसाठी भोजनदानाचे आयोजन करण्यात आले.

दुपारी २४ आरे धम्मसुत्त, पट्ठान पाठसुत्त, धम्मचक्कपवत्तनसुत्त तसेच परित्राणपाठाचे पठण करण्यात आले. यानंतर भंतेजी महान भिक्खू झाला, तसेच प्रथम धम्मसंगीतांचा प्रारंभही याच दिवशी झा चंद्रप्रभाव महाथेरो यांनी धम्मदेशना देताना श्रावण पौर्णिमेचे बौद्ध धम्मातील महत्त्व विशद केले. याच पौर्णिमेला अंगुलीमाल बुद्धांना शरण येऊनल्याचे त्यांनी सांगितले. प्रथम धम्मसंगिती नऊ महिने चालली, अशी माहितीही त्यांनी आपल्या धम्म देशनेतून दिली.

या कार्यक्रमाला नगरातील बौद्ध उपासक-उपासिकांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन भारतीय बौद्ध महासभा शाखा खापरखेडा आणि भारतीय बौद्ध महासभा महिला मंडळ शाखा खापरखेडा यांच्या वतीने करण्यात आले.

भंतेजींच्या प्रबोधनानंतर उपस्थितांना मिठाई, फळे व खिरीचे वाटप करण्यात आले.

अक्षराज



## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त 'जीवनधारा' तर्फे फुटबॉल स्पर्धेचे आयोजन; 'नो टू ड्रग्स'चा दिला संदेश

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२९, मानखुर्द :** राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून जीवनधारा संस्थेच्या वतीने युवकांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासोबतच व्यसनमुक्तीचा संदेश देण्यासाठी फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, एकूण २० संघांनी सहभाग नोंदविला.

या स्पर्धेत १० मुलांच्या आणि १० मुलींच्या संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि सांघिक भावना दाखवत आपले सर्वोत्तम प्रदर्शन केले. मुलांच्या गटातील अंतिम सामना चेंबूर संघाने जिंकत विजेतेपद पटकावले. तर मुलींच्या गटात जेवीएस जनजागृती विद्यार्थी संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद मिळविले.

फुटबॉलच्या माध्यमातून युवकांना शारीरिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासोबतच त्यांना व्यसनांपासून दूर ठेवणे हा या



स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता. नशेला नकार, जीवनाला होकार हा संदेश या स्पर्धेतून देण्यात आला.

आजच्या काळात युवकांमध्ये वाढत असलेल्या विविध प्रकारच्या व्यसनांमुळे त्यांच्या आरोग्यावर, शिक्षणावर, कुटुंबावर तसेच भविष्यात गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे युवकांनी व्यसनांच्या आहारी न जाता खेळ, शिक्षण आणि सकारात्मक उपक्रमांकडे वळावे, हा संदेश या स्पर्धेच्या माध्यमातून देण्यात आला.

नशा जीवन उध्वस्थ करते; त्यामुळे नशा करू नका आणि आपल्या आयुष्याला योग्य दिशा द्या, असा जनजागृतीपर संदेश स्पर्धेच्या माध्यमातून देण्यात आला. क्रीडा हा युवकांच्या सर्वांगीण विकासाचा प्रभावी मार्ग असून, खेळाच्या माध्यमातून आत्मविश्वास, शिस्त, नेतृत्वगुण आणि सांघिक भावना विकसित होतात, यावरही यावेळी भर देण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या फुटबॉल स्पर्धेमुळे खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ मिळाले, तसेच व्यसनमुक्त आणि निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी 'नो टू ड्रग्स'चा सकारात्मक संदेश मोठ्या प्रमाणात पोहोचविण्यात आला.

## ढोकेश्वर विद्यालयात क्रीडा दिन व रक्षाबंधनचा अनोखा संगम

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिवस व रक्षाबंधन उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य बाळासाहेब खिलारी म्हणाले, देशाच्या प्रत्येक खेळाडूची मेहनत व जिद्द लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण करणे, आरोग्य व तंदुरुस्तीबाबत जनजागृती करणे आणि खेळाडूंच्या योगदानाचा सन्मान करणे हा राष्ट्रीय क्रीडा दिनाचा मुख्य उद्देश आहे. खेळ माणसाला फक्त जिंकायलाच नाही, तर पराभवानंतर खचून न जाता पुन्हा उभे राहायला शिकवतो.



यावेळी भारतीय संस्कृतीचे महत्त्व विशद करताना त्यांनी सांगितले, समाजातील प्रत्येक स्त्रीकडे आई व बहिणीच्या नजरेतून पाहिले आणि भारतीय संस्कृतीचे जतन केले तर समाजातील अनिष्ट प्रकारांना आळा बसेल.

या कार्यक्रमात पुण्याहून आलेले प्रा. भरत राठोड यांनी विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी व १२ वी नंतर विविध क्षेत्रातील स्पर्धा परीक्षा व बहुपर्यायी करिअरच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यालयातील महिला शिक्षिकांनी वृक्षाला राखी बांधून वृक्षसंवर्धनाचा आगळा-वेगळा संदेश दिला, ज्याचे सर्वांनी कौतुक केले.

विद्यालयाच्या आरो वॉटर प्युरिफिकेशन सिस्टिमसाठी भाऊसाहेब खरात व शंकर पावडे यांनी प्रत्येकी २१०० रुपयांची मदत केली, तर इयत्ता ५ वी 'अ' ची विद्यार्थिनी श्रुती संभाजी मेहेर हिने वाढदिवसानिमित्त १००० रुपये दिले. दरम्यान पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, रविंद्र मते, कल्पना जाधव यांनी रक्षाबंधन व खेळाचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, वैशाली गायखे, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे, सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, वर्षा भोंडवे, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, सोनाली माळवदे, स्वाती भालेकर, साक्षी ससाणे, संतोष अडसूळ, सुदेश मुंडे, प्रणय ढुस, प्रिया नसवाले, करुणा जाधव, निलम झावरे, शिरीष राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, अमोल गोरे, नारायण हरेल, सुनीता घोडके आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले, तर आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले.

## कर्जत बस आगारात खड्ड्यांचे साम्राज्य; प्रवाशांची चिखलातून वाटचाल!

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि२९, कर्जत :** कर्जत एसटी बस आगाराची सध्या अत्यंत दुरवस्था झाली असून, संपूर्ण आगार परिसरात मोठमोठे खड्डे, चिखल आणि साचलेल्या पाण्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. पावसामुळे आगारातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, प्रवाशांसह विद्यार्थ्यांना चिखल व पाण्यातून मार्ग काढत बसमध्ये चढावे लागत आहे.

आगार परिसरातील विविध भागांमध्ये मोठमोठे खड्डे पडले असून, त्यामध्ये पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालक तसेच पादचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक ठिकाणी खड्ड्यांमध्ये चिखल साचल्याने बसपर्यंत पोहोचणेही प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयासाठी बस पकडताना या अस्वच्छ आणि गैरसोयीच्या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

बस उभ्या करण्याच्या जागेचीही दुरवस्था झाली असून आगारात अनेक एसटी बस चिखल व खड्ड्यांच्या परिसरात उभ्या असल्याचे चित्र दिसून येत



आहे. बसची ये-जा सुरू असताना चिखल उडण्याची शक्यता असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी खड्ड्यांमध्ये साचलेले पाणी स्पष्टपणे न दिसल्यास अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या गंभीर परिस्थितीबाबत कर्जत आगार व्यवस्थापक पृथ्वीराज भुताळे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी आगारातील खड्डे बुजविण्यासाठी खडी व अन्य आवश्यक मटेरियल जागेवर आणून ठेवण्यात आले आहे; मात्र काम करण्यासाठी मजूर उपलब्ध होत नसल्याने दुरुस्तीचे काम रखडले आहे, अशी माहिती दिली.

प्रशासनाकडून दुरुस्तीचे साहित्य उपलब्ध असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात आगारातील खड्डे, चिखल आणि साचलेल्या पाण्याची समस्या कायम असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे उपलब्ध साहित्याचा वापर करून काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी होत आहे.

कर्जत बस आगारासारख्या महत्त्वाच्या सार्वजनिक वाहतूक केंद्राची अशी अवस्था असताना संबंधित प्रशासनाकडून आवश्यक दुरुस्ती व देखभालीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे. पावसाळ्यातील परिस्थिती लक्षात घेता आगारातील खड्डे बुजवून पाण्याचा निचरा करण्याची तातडीची गरज आहे.

दररोज मोठ्या संख्येने प्रवासी आणि विद्यार्थी कर्जत बस आगाराचा वापर करतात. त्यामुळे आगारातील रस्त्यांची तातडीने डागडुजी करून खड्डे बुजवावेत, चिखल व पाण्याचा निचरा करावा आणि प्रवाशांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत आहे.

## गुटखा बंदीचा फज्जा ! जिंतूर तहसील-पंचायत समितीच्या भिंतींवर थुंकीचे डाग; प्रशासनाचे दुर्लक्ष

**अक्षराज : रहीम कोकर**

**दि२९, जिंतूर :** शासनाकडून गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही सार्वजनिक ठिकाणी त्याचे सेवन सुरूच असल्याचे चित्र जिंतूर शहरात पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, नागरिकांना शिस्त आणि स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या जिंतूर तहसील कार्यालय व पंचायत समिती परिसरातील भिंतीच गुटखा खाऊन थुंकल्याने रंगलेल्या दिसत आहेत.तहसील आणि पंचायत समिती ही नागरिकांच्या विविध कामांसाठी दररोज मोठ्या संख्येने नागरिक येणारी महत्त्वाची शासकीय कार्यालये आहेत.

मात्र या कार्यालयांच्या भिंतींवर ठिकठिकाणी गुटखा, तंबाखू आणि पान खाऊन थुंकल्याचे डाग दिसत असल्याने प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.भिंती रंगवण्यासाठी शासनाचा पैसा खर्च केला जातो; मात्र काही



नागरिकांच्या बेजबाबदार वर्तनामुळे काही दिवसांतच त्या भिंती पुन्हा थुंकीच्या डागांनी विद्रूप होत आहेत. त्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत असून कार्यालयाच्या परिसरातील स्वच्छतेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी असतानाही त्याची विक्री व सेवन खुलेआम सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. प्रशासनाकडून अधूनमधून कारवाई केली जाते; मात्र ती सातत्यपूर्ण नसल्यामुळे गुटखा विक्रेते आणि सेवन करणाऱ्यांवर अपेक्षित परिणाम होत नसल्याचे चित्र आहे.

शासकीय कार्यालयांच्या भिंतींवर थुंकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई का होत नाही? गुटखा बंदीची अंमलबजावणी नेमकी कुठे आहे? असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.तहसीलदार, पंचायत समिती प्रशासन तसेच संबंधित आरोग्य व अन्न-औषध प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन कार्यालय परिसरात गुटखा व तंबाखू सेवनास प्रतिबंध करण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, भिंतींवर थुंकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि गुटख्याची विक्री करणाऱ्यांवर नियमित तपासणी करून कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.प्रशासनाने स्वच्छतेचे आवाहन करण्यापेक्षा प्रथम स्वतःच्या कार्यालयाच्या भिंती स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी पार पाडावी, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## थोडक्यात बातम्या

### अश्विनी संजय भोसले यांच्या आकस्मिक निधनाने येरवडा सुन्न

**अक्षराज : प्राणिल कुसाळे**



**दि.२९, येरवडा (पुणे) :** येरवडा भागातील सलग तीन वर्षे नगरसेवक राहिलेले मा. संजय भोसले यांच्या पत्नी ॲड. अश्विनी संजय भोसले यांचे २९ ऑगस्ट रोजी रात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाल्याची दुःखद माहिती समोर आली. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच संपूर्ण येरवडा परिसरावर शोककळा पसरली.

अश्विनी भोसले यांनी २०२६ मध्ये झालेल्या पुणे महानगरपालिका निवडणुकीत भाजपकडून प्रभाग क्रमांक १३-क मधून निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांना तब्बल ९ हजार ७६३ मते मिळाली होती. अटीतटीच्या झालेल्या या लढतीत त्यांना ७५० मतांनी पराभव स्वीकारावा लागला होता. ॲडव्होकेट म्हणून कार्यरत असलेल्या अश्विनी भोसले यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रातही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती.

त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळी, समर्थक तसेच राजकीय वर्तुळात दुःखाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या पश्चात पती संजय भोसले आणि एक मुलगा असा परिवार आहे. अवघ्या चाळिशीच्या आसपासच्या वयात त्यांचे आकस्मिक निधन झाल्याने भोसले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण येरवडा परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

### दोघांचा बळी घेणारी वाघीण अखेर जेरबंद

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२९, चंद्रपूर :** नागभीड एफडीसीएम च्या कक्ष क्र. १०९ मध्ये दोघांचा बळी घेणाऱ्या टी-६१ सीएएफ वाघिणीस जेरबंद करण्यात वनविभागास अखेर शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी यश आले. एफडीसीएम कक्ष क्र. १०९ मध्ये १९ मे २०२६ रोजी वनिता शंकर उईके (रा. किटाळी मेंढा) व ४ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास रमेश जयराम काशिवार (वय ५४, रा. जनकापूर) हे गट क्रमांक १६८ मधील स्वतःच्या शेतात काम करत असताना त्यांना टी-६१ एसएएफ वाघिणीने हल्ला करुन ठार केले होते. ही वाघीण परिसरातील ही शेतशिवारात व गावाशेजारी फिरत असल्यामुळे गावामध्ये व शेतीवर जाणाऱ्या शेचकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. यापूर्वीसुध्दा या वाघिणीकडून मानव व पाळीव प्राण्यांना ठार केल्याच्या घटना घडल्या होत्या.

त्यामुळे गावकऱ्यांमधे वनविभागाप्रती रोष निरमाण झाला होता. यापुढे मानव-वन्यजीव संघर्षाच्या अनुचित घटना घडू नये याकरीता या वाघिणीस जेरबंद करणे आवश्यक झाले होते. त्यामुळे २८ ऑगस्ट रोजी या परिक्षेत्रातील उपक्षेत्र मिंडाळा नियतक्षेत्र मिंडाळा मधील कक्ष क्र. ८७ पी मध्ये पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रवीकांत खोब्रागडे यांनी डार्ट करुन दिला. त्यानंतर शुटर अजय मराठे यांनी वाघिणीला डार्ट मारुन बेशुध्द केले.

ही कार्यवाही ब्रम्हपुरी वनविभागाचे उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी एस. आर. यांचे मार्गदर्शनात सहायक वनसंरक्षक (प्रादे. व वन्यजीव) अरविंद जे. तसेच नागभीड वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे) भारती बगमारे, वन्यजीव तज्ञ राकेश आहूजा, मिंडाळाचे क्षेत्र सहाक एम. पी. तावाडे, डॉ. रवीकांत खोब्रागडे, शुटर अजय मराठे आदींच्या उपस्थितीत करण्यात आली.

### प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरी विश्वविद्यालयात रक्षाबंधन उत्साहात साजरा...



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, खापरखेडा (नागपूर) :** स्थानिक प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्व विद्यालयात अलौकिक रक्षाबंधन साजरे करण्यात आले. यानिमित्ताने व्यसनमुक्ती व व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला.

ब्रह्मकुमारी सेवा केंद्रामध्ये रक्षाबंधनचा पवित्र सण मोठ्या आनंदाने आणि आध्यात्मिकतेने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात देवाच्या स्मरणाने झाली. या प्रसंगी प्रमुख वक्त्या, कामठी सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्मकुमारी प्रेमलता दीदी यांनी रक्षाबंधनाच्या आध्यात्मिक रहस्यावर प्रकाश टाकताना सांगितले, हा सण केवळ धागे बांधण्यापुरता मर्यादित नाही, तर तो कौटुंबिक संबंध प्रेम आणि आदरावर आधारित असावेत हे शिकवतो. हा सण आपल्या हृदयात एकमेकांबद्दलची आपुलकी आणि स्नेहाची भावना अधिक दृढ करतो. हा सण आपल्याला शिकवतो की आपण आपल्यातील वाईट गोष्टी, नकारात्मकता आणि स्वार्थ सोडून पवित्रता, प्रेम आणि सद्गुणांचे जीवन जगावे. याचा संदेश संपूर्ण मानवजात, निसर्ग आणि समाजाच्या कल्याणाशी जोडलेला आहे, म्हणजेच प्रत्येक जीवाचा आदर करणे आणि संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे.

या प्रसंगी प्रत्येकाला चंदनाचा टिळा, आत्मस्मरणाचा टिळा लावण्यात आला आणि रक्षासूत्र बांधण्यात आले. परमेश्वर, भगवान शिव, आपल्या सर्वांच्या जीवांचे रक्षक आहेत; त्यांच्याशी एकरूप होणे हेच जीवनातील सर्वात मोठे संरक्षण आहे. हा उत्सव आपल्याला आपल्या शब्दांत, कृतींत आणि विचारांत गोडवा व पवित्रता आणण्याची प्रतिज्ञा देतो.

कार्यक्रमाला सरपंच मीनाक्षी तागडे, माजी सभापती चंद्रशेखर पानतावणे, कपिल वानखेडे, डॉ.ओंकार केळवडे, केशव पानतावणे, संजू गर्जे, ब्रह्माकुमारी संगीता दीदी यांनी कार्यक्रमाचे स्वागत केले, शिलू दीदी, सपना दीदी व सर्व ब्रह्माकुमारी बंधू भगिनींनी लाभ घेतला.